# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

**<u>दिनांक १०-०५-२०१६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक १० मे २०१६ रोजी (दि.२९.०४.२०१६ ची पुढे ढकललेली सभा का.प.क्र.१८) मा.महापौर श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ०३-३० वा वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश पवार नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१३. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१४. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१५. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१६. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१७. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
१८. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
१९. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२०. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२१. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२२. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२३. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२४. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
२५. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
२६. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
२७. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र

२८. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
२९. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३०. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३१. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
३२. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
३३. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
३४. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
३५. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
३६. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
३७. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
३८. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
३९. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४०. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
४१. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
४२. स.स. श्री.शेख जफर अखतर
४३. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
४४. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
४५. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
४६. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
४७. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
४८. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
४९. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
५०. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
५१. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
५२. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
५३. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
५४. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
५५. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
५६. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
५७. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
५८. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
५९. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
६०. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
६१. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
६२. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
६३. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
६४. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
६५. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम

६६. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
६७. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
६८. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
६९. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
७०. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
७१. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
७२. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
७३. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
७४. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
७५. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
७६. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
७७. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
७८. स.स.कु.जमादार सायली भागवत

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

मा.महापौर :महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आजच्या सभेचे आयोजन केलेले आहे. तसेच कर्मचारी आकृतीबंध हा विषय सुध्दा आहे. सविस्तर चर्चा करावी.

**<u>विषय क्रमांक ४११:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, “महानगरपालिकेचे उत्त्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मालमत्ता कर आकारणीची कार्यपध्दती, गुंठेवारी वसाहतीतील घरांना कर आकारणी व कर वसुली संबंधीची कार्यपध्दती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे”.

**सुचक:-** श्रीमती शेख समिना शेख इलियास, श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम शेख.

**अनुमोदक:-** श्रीमती मोरे ज्योती राजाराम, श्री.नितीन रमन चित्ते.

**<u>चर्चा:-</u>**

श्रीमती ज्योती मोरे :गुंठेवारी वसाहतीतील नागरीकांना त्यांनी अर्ज केलेल्या तारखेपासून कर आकारावा. जे की, नागरीक स्वत:हून कर भरण्यास पुढे येतील. २०X३० च्या घरांना १५ हजार पर्यत टॅक्स आकारलेला आहे. व्याजही आकारले आहे. ते रद्द करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :मनपा हद्दीत असलेल्या मालमत्ता मनपाच्या रेकॉर्डवर घेण्याबाबत पहिल्यांदा कार्यवाही करावी. अनेकदा स.पदाधिकारी यांनी बैठका घेतल्या. यासाठी एमएसईबीकडे शॉप नोंदणी विभागाकडील डाटा असेल, तो घेऊन कार्यवाहीचे सुचना दिलेल्या होत्या. कार्यवाही केली नाही. ज्यांना कर लावला तेच भरतात. ज्यांनी टॅक्स लावून घेतला नाही, ते सुविधा तर घेतात, अशांचा शोध घ्यावा व टॅक्स लावून वसुली करण्याची गरज आहे. टॅक्सचे रिव्हीजन होणे आवश्यक आहे. उपाय, सुचनाद्वारे प्रशासनाकडे दिल्या होत्या. महापालिका अधिनियमानुसार सहा.उपनिंबधक यांचेकडे संपुर्ण मालमत्तांच्या खरेदीची नोंद होत असते.

त्यांचेकडून सर्व माहिती मागविण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना आहे. ती माहिती मागितली नाही. जो भरता, त्याचेवर बोजा टाकणे योग्य नाही. अनेक लोक टॅक्स लावण्यासाठी येतात. टॅक्स लावला जात नाही. त्यांना चकरा माराव्या लागतात. टॅक्स लावतांना एकच टाईपची मिळकत असते. कमी जास्त टॅक्स लागला जातो. यापुर्वी सर्व्हे केला अनेकांना चुकीचा कर लावला आहे. एकाच घराला २-३ प्रकारचा टॅक्स लावले. या बाबतीत चांगले निर्णय स्ट्रक्चर करण्याची गरज आहे. फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला कराचे दर निश्चित करणे आवश्यक असते. जी थकबाकी ज्यांचेकडे आहे. त्याची सद्यस्थिती काय? कितींकडे मालमत्ता कर थकलेला आहे? माहिती घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :मनपाचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. तर एकीकडे महापालिकेच्या क्षेत्रात राहणारे नागरीक यांचे हित सुध्दा जपणे गरजेचे आहे. अनेक वर्षापासून करामध्ये वाढ केली नाही. वाढ केल्याचे चित्र नियमीत जनतेसमोर गेलेले आहे. जे भरतात त्यांना त्रास होतो. टेलिफोन, एमएसईबी सहा.उपनिबंधक नोंदणी कार्यालयाकडून आपणाला सर्व मिळकतीची माहिती घेता येऊन त्या रेकॉर्डनुसार अनेक मिळकती मनपास शोधून काढता येतील. परंतु दुर्लक्ष केले जाते. खाजगीकरण करण्यास हरकत नसावी. एमएसईबी, असेल टेलिफोन विभागाकडून दर महिन्याला बील वेळेवर पोहचते. महापालिका वर्षातून एक बिल सुध्दा वेळेवर देत नाही कारण काय? झोपडपट्टी असेल, स्लम भाग असेल, सर्व कर देण्यास तयार आहे. त्यांना योग्य मार्गदर्शन होत नाही. त्यांचेवर अन्यायकारक कार्यवाही होते. शेजारील दोन घरांना वेगवेगळा टॅक्स असतो. अशा अनेक तक्रारी आहे. अनेक प्रकरणे कोर्टात आहे. याचा अर्थ मनपाचे त्या प्रकरणात सहकार्य मिळत नाही. खाजगीकरण करून उत्पन्न वाढवावे. सर्वांना सोयी सुविधा मिळेल. न्याय मिळेल अशी कार्यवाही करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :सर्व सामान्य नागरीक वेळीच कर भरतो. परंतु ज्या मालमत्तांना कर लागलेलाच नाही, त्याचे सर्वेक्षण करावे. कर लावावा, दंडात्मक कार्यवाही करावी उत्पन्न वाढेल.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रोझोन मॉल, कॉलेज, शाळा लॅब असेल अशा ठिकाणी त्यांचेकडे असलेल्या पार्कींगला कर लावत नाही. परंतु तेथे पार्कीगचे रू.२५ प्रमाणे हजारो गाड्यांचे पार्कींग शुल्क वसुल करतात. अशा ठिकाणी कमर्शियल युज होत असेल तर, पार्कींगला टॅक्स लावावा. नवीन व जुन्या इमारतीच्या जागेवर किती इमारतीना बांधकामांना परवानगी दिली. जुन्या इमारतीच्या ठिकाणी अनेक मजली बांधकाम झाले. परंतु पुर्वीचा जर रू.२०० टॅक्स असेल, तर तोच आजही आहे. यांचे रिव्हीजन होणे गरजेचे आहे. मनपाचे मालमत्ता कराचेच उत्पन्न मोठे आहे. सर्व बाबी विचारात घेऊन कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :मागिल पाच वर्षाची वसुली बघता, सन २०१०-११ मध्ये कराची मागणी ५५.५१ कोटी वसुली ३५ कोटी ६३ टक्के, सन २०११-१२ मध्ये ७४ टक्के, सन १२-१३ मध्ये ७३ टक्के, सन २०१३-१४ मध्ये ६६ टक्के, सन २०१४-१५ मधे ७२ टक्के, सन २०१५-१६ मध्ये ५४ टक्के वसुली झाली. अनेक मालमत्ताचे बांधकाम झाले.

वापर सुरू झाला ॲसेसमेंन्ट न झाल्यामूळे टॅक्स लावून घेत नाही. अनेक मिळकतधारक नागरीक टॅक्स लावण्यासाठी वार्ड कार्यालयात जातात. कर्मचारी टॅक्स लावून घेत नाही. सुलभ टॅक्स लावण्याची पध्दत अवलंबविली जावी. सेल्फ ॲसेसमेन्टच्या माध्यमातून टॅक्स लावण्यास नागरीकांना आवाहन केल्यास अनेकजण समोर येतील प्रतिसाद मिळेल. जुन्या शहरात अनेक इमारती तोडून नवीन इमारती झाल्या. तेथे शॉपींग कॉम्प्लेक्स झाले. कर्मशियल युज होतो. तरी सुध्दा जुनाच टॅक्स. अशा मालमत्ता शोधण्याची गरज आहे. काही ठिकाणी कमर्शियल मिळकती आहेत, तेथे निवासी कर आहे. ज्या इमारतीवर मोबाईल टॉवर्स आहे त्या इमारतीना कमर्शियल टॅक्स लावावा. अग्निशमन व नगर रचना विभागाकडून एनओसी देत असतांना वार्ड अधिकारी याचा समन्वय असावा. कमर्शियल टॅक्स लावत नाही. तोपर्यत वापर सुरू होऊ नये. बांधकाम असलेले क्षेत्रानुसार टॅक्स लागलेला असावा. टपऱ्या असतील, महापालिकेच्या मालमत्ता असतील, लिजवर दिल्या. त्यांना कमर्शियल टॅक्स असावा. शहागंज सारख्या गजबजलेल्या भागात किती टपरीधारकांनी टॅक्स भरला. याची चौकशीची गरज आहे. टॅक्सचे स्ट्रक्चर मध्ये बदल न करता जी टॅक्स प्रणाली सध्या लागू आहे, ती प्रभावीपणे राबवावी. तर मालमत्ता कर न वाढविता उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

श्री.सुभाष शेजवळ :गुंठेवारीमध्ये सामान्य नागरीक असतात. त्यांना एका घराचा ८० हजार पर्यंत कराची नोटीस दिली जाते. गुंठेवारी भरण्यास अनेक लोक तयार आहे. कायदा आड आणून अधिकारी गुंठेवारी नियमित करीत नाही. सन २००१ पुर्वीचा प्लॉट किंवा घर असेल नियमित करता येते. माझ्या वार्डात ४००-५०० लोकांनी गुंठेवारी भरून ३५-४० लक्ष मनपाकडे जमा झाले. रू.१३६ स्क्वे. फुट प्रमाणे गुंठेवारी नियमित करण्याचा दर लावला, तरी सुध्दा नियमित करीत नाही. लोक भरण्यास तयार आहे. ज्यांनी गुंठेवारी भरलेली आहे. दाखला घेतला. त्यांना तरी सिंगल टॅक्स लावावा. सन २००१ पुर्वीचा प्लॉट घर असेल, त्याची गुंठेवारी नियमित करावे.

श्रीमती समीना शेख :शहरात ३०० वर मंगलकार्यालय रेकॉर्डवर ९३ आहे. त्यात काहीचे न्यायालयात प्रकरण तर काहीना कर लागलेला नाही तर काहींची माहिती मनपामध्ये उपलब्ध नाही. वार्ड-ई मधून ८-१० मंगलकार्यालयाची फक्त या वर्षी वसुली झाली. मागिल डाटा उपलब्ध नाही. अशी माहिती मला दिली. ९३ मंगल कार्यालयाकडून वसुली नाही. करच आकारला नाही. अनधिकृत ३०० च्या वर आहे. नोंदणी नाही. मोबाईल टॉवर्स ज्या इमारतीवर आहे. त्यांना कमर्शियल टॅक्स लावावा. जे अनधिकृत टॉवर्स त्यांना सील करून रिसतर परवानगी देऊन कार्यवाही करावी.

श्री.भगवान घडमोडे :वसुलीचे उद्दिष्ट प्रत्येक वर्षी पुर्ण होत नाही. वर्षा अखेरीस दमदाटी करून टार्गेट पुर्ण करण्याच्या हेतुने कार्यवाही होते. हे बरोबर नाही. प्रशासनाने वसुली वाढविण्यासाठी काय उपाय, नियोजन व तयारी केली? माहिती द्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :कर जास्त लागला व इतर कारणास्तव मा.न्यायालयात किती प्रकरणे प्रलंबीत आह? कर अदालत आयोजन बाबत धोरण ठेवावे.

श्रीमती समीना शेख :कर अदालत साठी स्थायी समितीमध्ये समिती गठीत करण्याचा प्रस्ताव आला होता. त्याची ही माहिति द्यावी.

श्री.भगवान घडमोडे :वादग्रस्त प्रकरण कशामूळे झाली याचा अभ्यास करावा. कमी जास्त कर लावण्यात येतो. तो नागरीक न्यायालयात दाद मागतो. अशी अनेक प्रकरणे आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:जे लोक कर भरतात. त्यांना बोजा टाकणे योग्य नाही. ज्यांनी टॅक्स लावून घेतला नाही. भरत नाही. त्याकडे लक्ष द्यावे. मालमत्ताचे रिव्हीजन करावे. वसुली बाबत नियोजन केल्यास, उत्पन्न वाढेल. अनेक ठिकाणी पार्लर सुरू करण्यात आले. मोठे इन्कम त्यातून त्यांना मिळते. त्यांनाही कर लावावा. जास्तीत जास्त नियोजन करून प्रशासनाने काम करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :वाढती लोकसंख्या व मालमत्ता लक्षात घेता प्रत्येक घराला टॅक्स लावला पाहिजे टॅक्स लावण्यासाठी सर्व्हे करणे व इतर कामासाठी ठराविक कालावधी असावा व त्या वेळेत टॅक्स आकारणी होऊन प्रकरण निकाली लागले पाहिजे. एक खिडकी योजना सुरू करावे. सर्व मिळकतींना टॅक्स आकारणी केल्यास कर वाढविण्याची गरज नाही. एमएसईबी यांचेकडून सर्व मालमत्तेचा डाटा घेण्यात यावा, घर तेथे कर ही संकल्पना समोर असावी. मालमत्तांचे सर्व्हेसाठी खाजगीकरण करण्याची गरज आहे. एका वार्डात किती घरे? कमर्शियल किती? मोकळ्या जागा किती? इतर मिळकती किती आहे? माहिति समोर येईल. कुणावर अन्याय होऊ नये मोबाईल टावर्स,शाळा, हॉस्पीटल,मॉल असतील होर्डीग्ज् आहे. कोचिंग क्लासेस यांचेकडून कमर्शियल टॅक्स वसूल करावा. पार्कीगच्या जागेवर अनेक जण पार्कींग शुल्क वसुल करीत आहे. मनपास उत्पन्न त्यातून येत नाही. त्या बाबतीतही ठोस निर्णय व्हावा. अनेक ठिकाणी अतिक्रमण करून कमर्शियल युज होत आहे. त्यांना टॅक्स नाही. सिडको मध्ये ओपनस्पेसवर पार्कींग होऊन वसुली होते. मनपास उत्पन्न येत नाही. जुन्या इमारतींना पुर्वीचाच टॅक्स आहे. सर्वेक्षण करावे. रिव्हीजन व्हावे. योग्य सर्व्हे केल्यास ३००-४०० कोटी कराच्या माध्यमातून वसुली होऊ शकेल. मालमत्ता करामध्ये कोणतीही वाढ होऊ नये.

श्री.राजगौरव वानखेडे :काही वार्ड कार्यालयाकडून चांगली वसुली होते. तेथे विकास कामे होत नाही. जेथून जास्त वसुली होईल तेथे कामे व्हावीत.

श्री.कैलास गायकवाड :गुंठेवारी भागातील घरांना डबल टॅक्स आकारणी होते. टॅक्स आकारणी बाबत जो निर्णय होईल, त्यानुसार अंमलबजावणी होणार काय? चर्चा होते. ठराव मंजूर होतात. अंमलबजावणी होत नाही. प्रशासनाकडे मनुष्य बळ आहे. प्रशासनाने काय उपाययोजना केलेल्या आहेत? एका आठवड्यात पुर्ण यंत्रणा सज्ज करून काम सुरू करावे.

श्री.विकास एडके :कर न वाढविता शहरातील सर्व मालमत्तांचे ॲसेसमेन्ट करावे. मॅन पॉवर वसुलीसाठी आहे का? विभाग प्रमुखाकडे कोणते चार्ज आहे? वसुली विभाग स्वतंत्र करून जास्तीत जास्त कर्मचारी वर्ग देवून वसुली वाढवावी.

श्रीमती माधुरी देशमुख :जे कर भरतात तेथे सुविधा दिल्या पाहिजे. कर वाढविणे कितपत योग्य वाटते. ज्यांनी कर लावला नाही, त्याची नोंद व्हावी. वसुलीचे उद्दिष्ट देतो, त्याप्रमाणे मालमत्ता सर्व्हे करण्याचे उद्दिष्ठ सुध्दा अधिकारी यांना दयावे.व्यावसायिक, रहिवासी व त्यापेक्षा उच्च कॉलीटीची मिळकत असे मालमत्तांचे वर्गीकरण करून कर लावावा. काही ठिकाणी इमारतींना जुनाच कर लावलेला आहे, परंतु तेथे व्यवसाय चालू आहे. त्यात वाढ करावी. मिळकतीचे रिव्हीजन व्हावे. वादपुर्व कर अदालत नियोजन करावे. सोलार सिस्टीम व वाटर हार्वेस्टीग वर सुट दिली जाते. हे नागरीकांपर्यत पोहचविले जावे. अनेक नागरीक चकरा मारतात. त्यांना सुट दिली जात नाही. अशा नागरीकांकडून एक फॉर्म भरून तेवढी रक्कम कमी केली पाहिजे. मालमत्तांची नोंद झाली नाही. प्रत्येक वार्डात अशा मालमत्ता आहे. सदस्यांना सुध्दा माहित असावेत. स.सदस्यांनी सहकार्य करावे. त्या नागरीकांना कर भरण्यास प्रवृत्त करावे. दंडाची रक्कम न आकारता या लोकांकडून कर भरणा करून घ्यावा. कर वाढ न करता ज्याची नोंद मनपाकडे नाही, त्या मिळकतीचे सर्व्हेक्षण करून कर लावावा. उत्पन्नात वाढ होईल.

श्री.भगवान घडमोडे :रेनवॉटर हॉर्वेस्टींगच्या करात सुट मिळावी. नागरीक चकरा मारतात. कोणत्या विभागाकडून कार्यवाही होणार? हे निश्चित केले नाही. सोसायटी, अपार्टमेंन्ट असेल यांनी सामुहिक रेनवॉटर हॉर्वेस्टींग केले तर कुणाला सवलत देणार? हे निश्चित करावे. याची अंमलबजावणी करण्यासाठी व वसुलीसाठी प्रशासनाच्या अडचणी काय माहिती घ्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :मालमत्ता खरेदीसाठी रेडीरेकनर प्रमाणे दर आकारले जाते. ज्या मालमत्ता कमर्शियल आहेत, जेथून त्यांना चागंले उत्पन्न मिळते, अशांना रेडीरेकनरची संकल्पना समोर ठेवून कर आकारावा.

मा.महापौर :उत्पन्न वाढविण्यासंदर्भात बरीच चर्चा झाली. यासाठी प्रशासनाने नेमकी काय तयारी केली? जे उद्दिष्ट ठरवून दिले. त्यानुसार वसुली होत नाही. गुंठेवारी भागाचा मालमत्ताचा विषय असेल, गुंठेवारी नियमीतीकरण दाखला दिल्यानंतर डबल टॅक्स सिंगल केला जाईल असे सांगतात. परंतु तसे होत नाही. रेनवॉटर हॉर्वेस्टींग सोलार सिस्टम बाबत कार्यवाही होत नाही. यामध्ये किती सुट दिली जाते? जनजागृती, उपाययोजना करणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगी देतांना रेनवॉटर हॉर्वेस्टींग, सोलार सिस्टीम करण्याची सक्ती असावी. ज्या उपाययोजना सदस्यांनी सुचविल्या. प्रशासनाने मत व्यक्त करावे. उत्पन्न वाढीसाठी काय करता येईल? प्रशासनाने माहिती द्यावी.

कर निर्धा. व संकलक :नोव्हेंबर २०१५ मध्ये या विभागाचा चार्ज मी घेतला दोन अडीच महिन्यामध्ये पाहणी करुन माहिती घेऊन फेब्रुवारी मध्ये प्रशासनाला १० पाणी अहवाल सादर केला. त्यात जे आताच प्रत्येक सदस्यांनी मांडलेले प्रश्न आले. १९८९ मध्ये मालमत्ताचे सर्व्हेक्षण केले होते. ३५-४० टक्के मालमत्तांना करच लागलेला नाही.

उर्वरीत ज्या मालमत्तांना कर लागला, त्या इमारतीमध्ये अमुलाग्र बदल जे की, जुनी इमारत तोडून दुकाने केली, व्यवसाय सुरू केला, दोन तीन मजली बांधकाम केले. परंतु जुनाच कर आहे. ॲसेसमेंन्टसाठी ६ वार्ड कार्यालयात फक्त ९ कर्मचारी, मॅन पॉवर कमी आहे. वसुलीसाठी १८५ कर्मचारी आहेत, परंतु त्यांना व्यक्ती निहाय वसुलीचे टारगेटच दिले नाही. ग्रुप नुसार कर्मचारी जातात. जी वसुली होईल, ती आणतात. पुर्ण सर्व्हे करावा लागेल. सहा महिन्याचा कालबध्द कालावधी दिलेला आहे. एका वार्डात २५००-३००० मालमत्ता असून डिटेल सर्व्हे करण्यासाठी एक दुय्यम आवेक्षक, जवान, एक लिपीक या अशी टिम करून त्यांनी दिवसभर काम केल्यास किमान २० घरांचा पुर्णत: सर्व्हेचे काम करून ॲसीसमेन्ट करतील. ज्यांना कर लागला त्यांना कर आकारला म्हणून नोटीस देतो. १५ दिवसांचा अवधी देतो. त्यांनी काही तक्रार केली नाही. तर तो लागलेला कर त्यास मान्य समजून तो आकारला जातो. जुलै-ऑगस्ट मध्ये बीलाची नोटीस जात असे. परंतु मा.महापौर,मा.आयुक्तांच्या सक्त सुचनेनुसार आता १० एप्रिल पुर्वीच नोटीसा दिलेल्या आहेत. नोटीस बील करण्याचा १२-१३ लक्ष खर्च आता ३ लक्ष मध्ये बील प्रिंट करून घेतले. बिलामध्ये कशी सुट मिळेल? सर्व दिले आहे. दरवर्षी या कालावधीपर्यंत कमी वसुली असेल, परंतु या वर्षी ४५ दिवसात ६.५० कोटी वसुली झाले आहे. सर्व्हे केल्यास ३५० कोटी वसुली होऊ शकेल. प्रत्येक मालमत्ताचे सर्व्हेक्षण करून २४०० मालमत्ताचा गट करून मिळकतीत जे काही बदल होईल, तो त्याची नोंद नेमून दिलेले कर्मचारी करतील. सर्व्हेक्षण साठी ५०४ कर्मचारी पाहिजे. तसेच वरिष्ठांना कळविले त्यावर प्रशासनाने असे ठरविले की, प्रत्येक मिळकतीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी एजन्सी नेमावी. टेंडर काढले टेंडर आलेले आहे. दोन दिवसात कार्यवाही होईल. दिलेले टारगेट चुकीच्या पध्दतीने दिले. ८० कोटीचे टारगेट दिले. ८५ कोटी डिमांड आहे. १८ हजार मालमत्ताची डबल नोंद झाली. १८ कोटी मायनस होतात. मोबाईल टॉवर्स इलिगल म्हणून कर लावला. त्यांनी टी पी विभागात परवानगी मागितली. विविध मुदतीत अर्ज निकाली काढला. नाही तर परवानगी दिली असे ग्रहीत धरले जाते. ७.२५ कोटी त्यांचेकडे थकबाकी आहे. शाळा कॉलेज यांना ४५ टक्के कर होता. सन-२०१२ मध्ये महासभेच्या निर्णयानुसार ३७.५० टक्के प्रमाणे कर लावावा. निर्णय घेतल्यानुसार कर आकारतो. बहुतेक शाळेचे असे म्हणणे की, निवासी दराने कर लावावा. काही प्रकरणात मा.कोर्टाच्या आदेशानुसार संस्थांनी ५० टक्के कर भरणा केलेला आहे. ९ शाळा सील केल्या होत्या. आजही ४ शाळा सील आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :शाळा व कॉलेज यांना सामान्य करात सवलत आहे. परंतु इतर कर हे कमर्शियल दरानेच आहे. योग्य ठोस निर्णय घ्यावा. थकीत १३-१४ कोटी थकबाकी आहे. ती वसुल होईल.

कर निर्धा.व संकलक :या संदर्भात कमेटी नियुक्त केली आहे. कमेटी निर्णय घेईल.

श्री.भगवान घडमोडे :एकूण कराची थकबाकी किती आहे.

| | |
|---|---|
| कर निर्धा.व संकलक | :२९० कोटी थकबाकी यात व्याज व दंड ८५ कोटी आहे. कराच्या संदर्भात बरीच प्रकरणे मा.न्यायालयात आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | :एवढी थकबाकी असेल तर, यास हे सभागृह जबाबदार नाही. कुणाच्या कार्यकाळात थकबाकी झालेली आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी. या संस्थेचे उत्पन्न वाढले पाहिजे. यांचे पगार रोजीरोटी मुलांचे शिक्षण यावर आहे. उत्पन्न वाढविण्याची काळजी अधिकारी घेत नाही. |
| श्री.अजीम अहेमद | :माझ्या वार्डात २.५० लक्षचे ड्रेनेजचे काम होत नाही. २९० कोटी कराची थकबाकी ठेवली जाते. योग्य नाही. |
| श्री.कैलास गायकवाड | :१८ हजार मालमत्ताची डबल नोंद झाली. संगणक कक्ष १०-१२ वर्षापासून कार्यरत असून डिमांड नोटीस नोंद करतात. दुरूस्त करतात. तेच चुका करतात. असे होत असेल, तर हा विभाग कशासाठी आहे? अनेक कर दाते मालमत्ताची डबल नोंद झाल्यामूळे संगणक विभाग वार्ड कार्यालयात चकरा मारतात. त्याची दखल कुणी घेत नाही. |
| मा.उपमहापौर | :ऑनलाईन टाईप होते, तर त्यात चुक होऊ शकत नाही. |
| कर निर्धा.व संकलक | :डबल नोंदी झालेल्या मालमत्ताची वार्ड कार्यालयाकडून माहिती मागितली. एकूण ४५० मालमत्ता क्लिअर केल्या बाकीच्यांची कार्यवाही होत आहे. |
| श्रीमती समीना शेख | :टॉवर्सला परवानगी एक महिन्याच्या आत दिली नाही तर आपोआपच अधिकृत होतात. वेळेच्या आत परवानगी दिली नाही तर यास जबाबदार कोण? ५ हजार अनधिकृत टॉवर्स आहे यास जबाबदार कोण? |
| कर निर्धा.व संकलक | :मा.न्यायालयात प्रकरण गेलेले आहे. काही मोबाईल कंपनी कर भरतात. ती माहिती दिली. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :२९० कोटी कराची थकबाकी असल्याचे सांगतात. किती टक्के मालमत्ताचे ॲसीसमेन्ट केलेले आहे? |
| कर निर्धा.व संकलक | :२९७ मिळकतीचे ॲसीसमेन्ट केले. १.९७ लक्ष मिळकती आहेत. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :शहरात निवासी मिळकती २.६५ लक्ष आहेत. या सर्वांची थकबाकी २९० कोटीच्या वर होईल. ५०-६० हजार मिळकती आजही रेकॉर्डवर नाही. या सर्वांची नोद रेकॉर्डवर आली, तर ५०० कोटी कराच्या माध्यमातून मिळू शकेल थकबाकी वसूलीसाठी प्रशासनाने पावले उचलावी. तशा सुचना द्याव्यात. करामध्ये वाढ करू नये. एमएसईबी,सहा.उपनिबंधक यांचेकडील खरेदी विक्रीचा डाटा असेल, तो घ्यावा व आपल्या रेकॉर्डनुसार तपासणी करून सर्व मिळकतीचे ॲसीसमेन्ट करावे. निवासी, व्यावसायिक व इतर वापर असे वर्गीकरण मिळकतीचे व्हावे. अधिकृत अनधिकृत टॉवर्सला किती टॅक्स आकारला जातो? जसें होर्डिंग्जला सांकेतांक क्रमांक टाकला जातो. त्याप्रमाणे मोबाईल टॉवर्स नंबरींग असावे. यामूळे लिगल इलिगल टॉवर्स कोणते लक्षात येईल. आताच सुचना केल्यानुसार कार्यवाही केल्यास कर वाढ करण्याची गरज नाही. थकीत रक्कम वसुलीचे टारगेट देण्यात यावे. |

श्रीमती समीना शेख :मंगल कार्यालयाची माहिती मागितली होती. अनधिकृत टॉवर्स बाबत कार्यवाही करण्याचे मा.सभापती स्थायी समिती यांनी एका सभेत आदेशीत केले होते कार्यवाही का होत नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :मंगल कार्यालय, पंचताराकिंत हॉटेल ३-३ लक्ष भाडे घेतात. पावती देतांना सेलटॅक्स, व्हॅट व इतर प्रकारे रक्कम नमूद असते. त्या प्रमाणे कर लावतांना ते बील देतील, त्यानुसार टॅक्स आकारावा. मंगल कार्यालय सुध्दा १-१ लक्ष भाडे घेतात. या सर्वांचा सर्व्हे करून त्यांना मिळणारे उत्पन्न व यानुसार टॅक्स लावण्याचे धोरण निश्चित करावे.

श्रीमती समीना शेख :काही मंगल कार्यालय यांना निवासी कर लागलेला आहे तो कमर्शिलय करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :पार्कीगच्या जागेवर वापर होऊन कुणी उत्पन्न मिळवीत असेल तर त्यास टॅक्स आकारावा.

कर निर्धा.व संकलक :प्रोझन मॉलला पार्कीगच्या जागेसह २८ लक्ष टॅक्स लावलेला आहे.

श्री.भगवान घडमोडे :ज्यांचेकडे थकीत रक्कम आहे. ती वसुल करण्यासाठी नियोजन करावे. थकबाकीदारांची नावे पेपरला पब्लीश करावी. त्यांचेशी चर्चा करून निर्णय घ्यावा. झोपडी व बंगला यांना एकच एनआरव्ही प्रमाणे कर आकारतो. काही भागात सुविधा देत नसतांना सिव्हरेज टॅक्स आकारतो. या सर्व गोष्टीचा विचार व्हावा. जे नियमीत कर भरतात, त्यांना उशीरा बील देऊन सुध्दा व्याज आकारले जाते. त्यामूळे मिळणारी सुट घेता येत नाही. बील जेव्हा दिले जाईल त्यानंतर ९० दिवसात त्यांनी कर भरणा केला नाही, तर व्याज आकारू शकतो. कुणावर अन्याय होऊ नये.

कर निर्धा.व संकलक :८५ कोटी व्याज, दंडाची रक्कम आहे. डबल मालमत्ताचा रेकॉर्ड अपडेट होऊन १० वर्षापासून पुन्हा तीच नोंद येते. अशा मालमत्ता काढाव्या लागतील.रेडीनेकनर प्रमाणेच कर लावतो शहरात मिळकतीचे चार भागात वर्गीकरण केले.

मा.उपमहापौर :सर्व्हेक्षणाचे टेंडर काढले काय आहे माहिती द्यावी.

कर निर्धा.व संकलक :जीपीएस सिस्टीम द्वारे कार्यवाही होईल. प्रत्येक भागाचे ब्लॉक नूसार कार्यवाही होईल. मिळकतीस नंबर, मिळकतधारकाचे आयडी प्रुफ घराचे कागदपत्रे घेणार, फोटो घेणार, प्रत्यक्ष मोजमाप आजचा कर काय? जुना काय आहे? जुनाच कर असेल. तर नवीन किती असायला पाहिजे? सर्व नोंदी घेऊन कार्यवाही होईल. १२ महिन्याचा अवधी या सर्व्हेक्षणसाठी असेल.

श्री.नंदकुमार घोडेले :स्पेक कंपनीने सर्व्हे केला त्या व्यतिरिक्त इतर नवीन सर्व्हेमध्ये काय करणार आहे?

श्री.भगवान घडमोडे :यापुर्वी जे खाजगीकरण केले, ते महापालिकेच्या फायद्याचे न होता कंपनीच्या हिताचेच करारनामे केले. स्पेक कंपनीने १० वी पास मुले कामाला लावली. ॲसेसमेन्ट केले नाही. चुकीच्या नोटीसा दिल्या. शेवटी काम सोडून गेले. आता खाजगीकरण करतांना योग्य निकष लावून नियोजनबद्द काम करून महापालिकेचे नुकसान होऊ नये याची काळजी घ्यावी. कर्मचारी यांचेवर नियंत्रन असावे. जो चुक करीत असेल त्यांना सरसकट दंड लावावा. टीम वर्क

करून वसुली वाढवावी. ज्यांचेकडे मोठी थकबाकी आहे, नाव पब्लीश करून कर भरणा करीत नसतील, तर कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :वसुलीसाठी चांगले कर्मचारी पाहिजेत, जो कर्मचारी ॲसेसमेन्ट करील त्यांना ओळखपत्र  तसेच गणवेश असावा.

श्री.राजगौरव वानखेडे :आज बील वाटप होते व १० तारखेच्या आत कर भरावा, असे नोटीसमध्ये असते. त्या बाबतीत काय निर्णय घेणार आहे.

कर निर्धा. व संकलक :एप्रिल १० टक्के, मे ८ टक्के, जून ६ टक्के अशी सुट आहे.

मा.उपमहापौर :१० टक्के सुट घ्यायची असेल, तर एप्रिल मध्ये बील मिळायला पाहिजे. १ महिना उशीरा बिल देणार असेल, तर मे महिन्यात १० टक्के सुट द्यावी.

कर निर्धा.व संकलक :१.९७ लक्ष मालमत्ता धारकास नोटीस एकाच दिवशी देऊ शकत नाही. मागिल वर्षाची डिमांड निश्चित करावी लागली, या नोटीसा वेळेवर गेलेल्या आहेत.

श्री.राजेंद्र जंजाळ :जेव्हा बील द्याल तेव्हापासूनची तारीख ग्राह्य धरावी व पुढील सवलत द्यावी. ई-मेल व सुविधांच्या माध्यमांतून त्यांना मॅसेज पोहचवावा. चर्चा झालेली आहे योग्य निर्णय घ्यावा.

मा.महापौर :एकूण २९० कोटीची थकबाकी आहे. यातील जास्तीत जास्त वसुली करावी, खरेदी विक्रीच्या माध्यमातून जे व्यवहार होतात, त्यानुसार मिळकतीचा रेकॉर्ड अपडेट होईल. एमएसईबी इतर विभाग असेल, त्यांचेकडून डाटा घ्यावा. अशा मालमत्तांना टॅक्स लावावा. एकाच भागात शेजारील दोन मिळकतीना वेगवेगळा टॅक्स आकारला जातो. तो कशामूळे कमी जास्त आकारला गेला? याची पडताळणी होणे गरजेचे आहे. कुणावर अन्याय होऊ नये. शहरात नवीन ६५-७० हजार मालमत्ता असतील. सर्व्हेक्षण करावे टॅक्स लावावा. शाळा, विद्यालय, मॉल, मंगल कार्यालय असेल तेथे मोठ्या जागा कमर्शियल वापर होतो. तेथे उत्पन्न मिळविले जाते, महापालिकेस काहीही मिळत नाही. या बाबतीत नियोजन करावे. सध्या वसुली कमी प्रमाणात येते. येणाऱ्या काळात त्यात वाढ व्हावी. लॉन्स, मंगलकार्यालय, मॉल्स असतील, फायरची एनओसी ते घेत नाहीत. त्यामूळे टॅक्सही लावत नाही. या बाबतीत मा.आयुक्त यांनी स्वतः लक्ष देऊन या सर्व कमर्शियल मिळकतीना टॅक्स कसा आकारला जाईल? काळजी घ्यावी. मनपाच्या जागा टपऱ्या, अनेक व्यापारी संकुल तेथे दुकाने आहे, त्यांचेकडील भाडे ही वसुल करावे. कमेटीने हा निर्णय घ्यावा. गुंठेवारी रेग्युलर करणे अगोदर डबल टॅक्स आकारला जातो. नंतर तेथे गुंठेवारी नियमीतीकरण केल्यानंतर तो टॅक्स सिंगल करायला पाहिजे. परंतु कार्यवाही का होत नाही?

कक्ष प्रमुख (गुंठेवारी ) :२००१ च्या नंतरचा बांधकामाचा पुरावा नसेल, आपण प्लॉट नियमीत करतो. त्यानंतर त्यावरील बांधकाम हे अनधिकृत राहते. २०० प्लॉट नियमित केलेले आहेत. टॅक्स डबल लावायचा की, सिंगल धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षीत आहे. गुंठेवारी ही फक्त प्लॉटची केलेली आहे. जर बांधकाम नियमीत झाले असेल तर कर आकारणी विभागाकडून सिंगल टॅक्स लावला जातो. दंड लावला जात नाही.

मा.महापौर :२००१ पुर्वीची शिवशंकर कॉलनीतील घरे तेथील लोकांनी नियमीतीकरणाचे प्रमाणपत्र घेतले. भवानीनगर येथेही ९०-९५ ची घरे गुंठेवारी केले. प्रमाणपत्र घेतले. त्यानंतर सिंगल टॅक्स केला जात नाही. या सभेचा निर्णय आहे की, २००१ पुर्वीची प्लॉट घरे ज्यांनी नियमीतीकरण प्रमाणपत्र घेतले, त्यांना मागिल तारखेपासून सिंगल टॅक्स आकारावा.

श्री.आत्माराम पवार :२००१ पुर्वीचे प्लॉट असेल, तेथे घरे झाली. त्यांनी गुंठेवारी केली असेल नियमीतीकरणाचा दाखला घेतला असेल तर सिंगल टॅक्स असावा.

कक्ष प्रमुख-गुंठेवारी :बांधकामाचा पुरावा नसेल भुखंडाचा असेल, तरी प्लॉट नियमितीकरण केले जाते.

श्री.आत्माराम पवार :पुंडलिकनगर शिवाजी महाराज पुतळा जवळ १९९५ पासून घरे दुकाने आहे. डबल टॅक्स लावला. गुंठेवारी ही करीत नाही. तेथील भागातील गुंठेवारी करून घ्यावे. टॅक्स डबल असेल तर सिंगल करावा.

मा.महापौर :वर्ष अखेर वसुलीची सक्ती न करता पुर्ण वर्षाचे नियोजन वसुलीसाठी करावे. जे वादग्रस्त कराची प्रकरणे असतील, समिती अदालतच्या माध्यमातून निर्णय घ्यावा. एक खिडकी योजना सुरू करून प्रकरणे निकाली काढावी. रेनवॉटर हार्वेस्टिंग सोलार सिस्टम यावर देण्यात येणारी सुट यासाठी तातडीने नियोजन करावे. मालमत्ताचे सर्वेक्षण करावे. सेल्फ डेव्हलपमेंन्टसाठी नियोजन करावे. जेथे कमर्शियल युज होतो, त्या सर्वांची नोंद रेकॉर्डवर व्हावी. करामध्ये कोणतीही कर वाढ न करता थकीत व चालू वर्षाचा कर वसुल करण्यासाठी प्रयत्न करावे.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मालमत्ता कर आकारणीची कार्यपध्दती, गुंठेवारी वसाहतीतील घरांना कर आकारणी व कर वसुली करुन महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी खालील नमुद मुद्यांबाबत योग्य ते नियोजन करुन याची अंमलबजावणी करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. मालमत्ता कराची असलेली एकूण थकबाकी जास्तीत जास्त वसुली करणे, खरेदी विक्रीच्या माध्यमातून जे व्यवहार होतात तेथील रेकॉर्ड घेऊन तसेच एमएसईबी व इतर शासनानचे विभाग असेल, त्यांचेकडून डाटा अपडेट करुन अशा मालमत्तांना टॅक्स लावण्यात यावा व या मालमत्तांची नोंद मनपाच्या रेकॉर्डवर घेणे.

२. एकाच प्रकारच्या दोन इमारतींना वेगवेगळा टॅक्स आकारला जातो याची दखल घेण्यात यावी. शहरात नवीन ज्या ही मालमत्ता उदा. शाळा, विद्यालय, मॉल, मंगल कार्यालय असेल, टॉवर्स असेल तेथे मोठ्या प्रमाणात जागेचा कमर्शियल वापर होतो उत्पन्न मिळविले जाते अशा मिळकतींचा सर्व्हे करून या मिळकतींना व्यावसायीक दराने मालमत्ता कर लावण्यात यावा.

३. लॉन्स, मंगलकार्यालय, मॉल्स व इतर व्यावसायीक यांना फायरची एनओसी घेणे बंधनकारक करणे तसेच मनपाच्या मोकळ्या जागा, टपऱ्या, अनेक व्यापारी संकुल, दुकाने यांना भाडे कमेटीने भाडे आकारून योग्य कर लावण्याबाबत निर्णय घेणे.

४. गुंठेवारी नियमीतीकरण केल्यानंतर आकारण्यात आलेला डबल टॅक्स तो सिंगल आकारण्यात यावा.

५. मालमत्ता कराची थकबाकी व चालु वर्षाच्या वसुलीसाठी पुर्ण वर्षाचे नियोजन करण्यात यावे, जी वादग्रस्त कराची प्रकरणे असतील अशी प्रकरणे समिती कर अदालतच्या माध्यमातून निर्णय घेणे तसेच एक खिडकी योजना सुरू करून कराच्या बाबतीतली वादग्रस्त प्रकरणे निकाली काढणे.

६. रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलार सिस्टम यावर देण्यात येणारी सुट, मालमत्ताचे सर्वेक्षण, सेल्फ डेव्हलपमेंन्ट यासाठी तातडीने नियोजन करणे, जेथे कमर्शियल युज होतो, त्या सर्व मिळकतींची नोंद मनपाच्या रेकॉर्डवर घेणे करामध्ये कोणतीही कर वाढ न करता थकीत व चालू वर्षाचा कर वसुल करण्यासाठी प्रशासनाने योग्य तो नियोजन करून कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१२:-** **(सर्वसाधरण सभा दिनांक १५.०३.२०१६ कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१५ मधील स्थगीत विषय क्रमांक ३४६)**

**(उपआयुक्त, आस्थापना)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यस्थितीत औरंगाबाद शहराची लोकसंख्या १५ लक्षच्या आसपास आहे. लोकसंख्येचे प्रमाण वाढलेले असून शहराचा विस्तार देखील वाढलेला आहे. सध्या ०६ वॉर्ड कार्यालये असून सातारा व देवळाई भाग महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झाल्याने प्रभागांची संख्या ११५ झाली आहे. भविष्यात आणखी वॉर्ड कार्यालये वाढणार आहेत. तसेच शहरातील वाढत्या मालमत्ता लक्षात घेता कर वसुलीसाठी व कार्यालयीन कामासाठी, नागरीकांना पुरवावयाच्या सोयी सुविधांची देखभाल दुरुस्ती आणि नविन विकास कामे करण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचे प्रारुप तयार करण्यात आले आहे. सदर आकृतीबंधामध्ये मंजूर पदाव्यतिरिक्त नवनिर्मित करावयाच्या पदांचा समावेश करुन शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावयाचे आहे.

त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून शासनास सादर करावयाचा आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.भगवान घडमोडे :शासनाकडून या प्रस्तावाविषयी पत्र आलेले आहे काय ?

श्री.राजेंद्र जंजाळ :आकृतीबंध तयार करून या सभेची मान्यता न घेता डायरेक्ट शासनाकडे पाठविले. या सभेची मान्यता घ्यावी लागेल. शासनाने आठवण करून दिली. म्हणून हा प्रस्ताव आलेला आहे.

उपआयुक्त(आस्थापना): आकृतीबंध तयार करून शासनाकडे पाठविण्यात आले होते. शासनाकडून पत्र आले की, सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी. कलम ५३ नुसार कोणतेही नवीन पद निर्माण करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता लागते.

श्री.भगवान घडमोडे :त्यावेळेस सर्वसाधारण सभा अस्तित्वात नव्हते काय ?

उपआयुक्त-आस्थापना :त्यावेळी या विभागाचा चार्ज माझ्याकडे नव्हता.

मा.उपमहापौर :उपआयुक्त ३ पदे असतांना ४ पदाची कार्यकारी अभियंता २ पदे असतांना ३ मंजूरीसाठी नमूद केले. शासनाने २०१० मध्ये नियम तयार केले. त्यानुसार कार्यवाही होते का? यासभेची मान्यता का घेतली नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :या सभेची मान्यता न घेता कोणी पाठविले. मंजुरी का घेतली नाही? मा.आयुक्ताकडुन खुलासा घ्यावा.

श्री.भगवान घडमोडे :सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक होती. शासनाने मंजूर केले असते, तर मनमानी पणे यांनी जो मागेल त्यांना त्या पदावर बसविले असते.

प्र.मा.आयुक्त :आकृतीबंध हा जवळपास २५ वर्षाची कर्मचारी संख्या गरज लक्षात घेऊन केलेला असतो जी पदे असतील, त्यास ॲक्ट नुसार सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु हे परस्पर पाठविले गेले होते. त्यावेळी कमेटी होती तत्कालीन मा.आयुक्तांनी डायरेक्ट शासनाकडे पाठविले होते.

मा.उपमहापौर :शासनाकडे पाठवितांना उपआयुक्त/कर निर्धारक व संकलक ४ पदे मंजूर असे दिले. २००६ मध्ये शासनाने मंजूरी दिली. तेव्हा उपआयुक्त ३ पदे क वर्गामध्ये आहे. कर निर्धा.व संकलक हे पद वेगळे असतांना एकत्रित कसे केले? ही दोन्ही पदे सारखे आहेत का? कर निर्धा.व सकंलक पदासाठी शैक्षणिक अर्हता टेक्नीकल काय पाहिजे? त्यांना उपआयुक्त म्हणणार काय? डॉक्टरला बांधकाम करण्याचे काम देणार काय? चुकीचा अहवाल शासनास पाठविला. कुणी अहवाल तयार करून पाठविला.

श्री.कैलास गायकवाड :त्यावेळी आस्थापना विभागाचा चार्ज कुणाकडे होता? समितीची बैठक होऊन चर्चा होऊन निर्णय घेतला असेल सर्व माहिती द्यावी.

मा.महापौर :समिती असेल, परंतु त्यावेळी आस्थापना अधिकारी कोण होते?

श्री.भगवान घडमोडे :शासनाकडे मंजूरीसाठी नियमाला धरून पाठविले नाही. कुणी पाठविले? कशामूळे पाठविले? सर्वसाधारण सभेची मान्यता का घेतली नाही? याचा खुलासा होऊन संबंधीतांवर कार्यवाही व्हावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता आकृतीबंध शासनास पाठविला. सभेची मान्यता घेऊन पाठवावे. शासनाने कळविले. अधिकारी कर्मचारी यांचा जो गोषवारा तयार केला. शासनाचे २००६ च्या जीआर नुसार यात पदाच्या संख्येत मोठी तफावत येते. यात उपआयुक्तांची दोन पदे, सहा.आयुक्ताची ५, अशी २१ पदे दिली. हा आकृतीबंध तयार करीत असतांना ३१-३-२०१६ पर्यंत आस्थापनेवर किती पदे मंजूर, रिक्त किती? होणाऱ्या खर्चाची टक्केवारी किती? प्रशासकीय लेखा, व तांत्रिक सेवा यानुसार गोषवारा तयार करायला पाहिजे होता यात कोणत्याही नियमाचे पालन केले नाही. या विषयासंबंधी तज्ञ समिती नियुक्त करावी व ती समिती अभ्यास करून त्यांचा अहवाल देईल. त्यानंतरच या विषयावर निर्णय होणे योग्य होइल.

श्री.भगवान घडमोडे :सभेची मान्यता का घेतली नाही? आमचे अधिकार का डावलले? त्यास जबाबदार कोण कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :या सभागृहाची मान्यता न घेता शासनाकडे पाठविले. हा सभागृहाचा अवमान आहे चौकशी करावी. दोषीवर कार्यवाही व्हावी. त्यानंतरच यावर चर्चा व्हावी.

मा.महापौर :कमेटीत कोण अधिकारी होते? एकटे आयुक्तांचीच चुक आहे का? बाकीचे अधिकारी कोण होते?

मा.उपमहापौर :०२ कार्य.अभियंता पदे मंजूर असतांना ३ पाठविले.

श्री.विकास एडके :यात गैरप्रकार आहे. चुकीच्या पध्दतीने शासनाकडे पाठविले. या सभेची मान्यता घेतली नाही. या संदर्भात शासनाकडे मी पत्र दिले. असा प्रस्ताव आलेला नाही असे म्हटले व प्रस्ताव आला तरी विखंडीत केला जाईल. असे म्हटले आहे.

प्र.मा.आयुक्त :मॉडल सेवा प्रवेश नियम तयार करण्यासाठी कमेटीमध्ये उपआयुक्त महसूल अध्यक्ष, तसेच मुख्यलेखा परीक्षक, शहर अभियंता आरोग्य वैद्य.अधिकारी, विधी सल्लागार सदस्य, आस्थापना अधिकारी -१ सदस्य सचिव होते.

उपआयुक्त(आस्थापना) :ही कमेटी मॉडल सेवा प्रवेश नियम करण्यासाठी होती. या समितीचा आकृतीबंधाशी संबंध नाही.

श्री.विकास एडके :दिनांक ४-५-२००६ ला शासनाचा काही पदाच्या बाबतीत निर्णय आहे. त्यानुसार महापालिका त्यात येते का? क मध्ये किती उपआयुक्त असायला पाहिजे? ३८ पदाचे प्रोव्हीजन दिले. आता पुन्हा जास्तीचे पदे नमूद करून ते मंजूर होणार नाही. तर कशासाठी पाठवित आहोत.

उपआयुक्त(आस्थापना) :कमेटीत उपआयुक्त महसूल श्री.बोर्डे, मुख्य लेखा परीक्षक श्री. थत्ते, शहर अभियंता श्री.पानझडे हे होते. या समितीचा आकृतीबंध पाठविण्याशी संबंध नाही. हा प्रस्ताव आस्थापना अधिकारी-१ श्री.पैठणे, उपआयुक्त महसूल श्री.बोर्डे व मा आयुक्त श्री.प्रकाश महाजन यांनी पाठविलेला आहे. मॉडल सेवा प्रवेश नियम २००८ आले त्यास महासभेने २०१२ साली मान्यता दिली. त्यास ती मान्यता समजून प्रस्ताव पाठविला. आस्थापनेवर ९७९ पदे मंजूर आकृतीबंध नुसार १७६८ पदे झाली. एकही पद वाढले तर त्यात ५३(३) नुसार महासभेची मान्यता पाहिजे. पाठवितांना हा समज झाला की, यास महासभेची मान्यता झाली आहे.

मा.उपमहापौर :२००६ चा शासन जीआर आहे. सहा.आयुक्त -३ व कर निर्धा.व संकलक १ अशी चार पदे वेगवेगळी आहे. हे माहिती नव्हते का? कर निर्धा.व संकलक अधिकारी टेक्नीकल की नॉन टेक्नीकल असता?

श्री.भगवान घडमोडे :आमच्या अधिकारावर गदा आणली. त्याचेवर कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :या प्रकरणात मा.विभागीय आयुक्त यांना पत्र देऊन चौकशी करण्याचे आदेशीत करावे. अहवाल आल्यानंतर चर्चा करून निर्णय व्हावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.विभागीय आयुक्त यांना चौकशी करण्यासाठी पत्र द्यावे. अहवाल आल्यानंतर चर्चा करावी.

श्रीमती किर्ती शिंदे :शहराची लोकसंख्या विचारात घेऊन हे शहर स्मार्ट सिटीत समावेश होईल. या दृष्टीने येथील नागरीकाना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी हा विषय दुरूस्ती करून यासाठी तरतूद ठेवावी.

मा.महापौर :आकृतिबंधच्या विषयावर सविस्तर अशी चर्चा झाली. सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता डायरेक्ट शासनाकडे मंजूरीसाठी पाठविले. सर्व सदस्यांच्या अधिकारावर गदा आणण्याचा हा प्रकार म्हणावा लागेल. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता, या आकृतिबंध विषयाच्या संपूर्ण प्रकरणात कोण दोषी आहे? याची चौकशी करीता, मा.विभागीय आयुक्त यांना चौकशी करण्याचे पत्र दिले जाईल अहवाल येईल. त्यानंतर यावर जो निर्णय होईल तो घेतला जाईल.

श्री.कैलास गायकवाड :महापालिकेचे आयुक्त यांचेकडे चौकशी द्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :समान पद दर्जाचे अधिकारी असेल तर त्यांचे पेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी यांचेकडे चौकशी देणे योग्य वाटते.

मा.महापौर :या प्रकरणाची संपूर्ण चौकशी या महापालिकेचे मा.आयुक्त यांनी करावी. तसे पत्र दिले जाईल. चौकशीचा जो अहवाल येईल. तो सभागृहासमोर ठेवून योग्य निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आकृतीबंधला सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता डायरेक्ट शासनाकडे मंजूरीसाठी कोणी पाठविले? तसेच आकृतीबंधमध्ये नमुद केलेली पदसंख्या नियमानुसार बरोबर आहे किंवा कसे? याबाबत मा.आयुक्त यांनी सविस्तर चौकशी करून चौकशीचा अहवाल सभागृहासमोर सादर करण्यास मंजुरी देण्यात आली. तुर्त या विषयास स्थगिती देण्यात येते.
या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद